दाखल दिनांक : ०८/०१/२०१८
नोंदणी दिनांक : ०८/०१/२०१८
न्यायनिर्णय दिनांक : १८/०२/२०२०
कालावधी: ०२ वर्ष, ०१ महिने, १० दिवस

## विद्यमान प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी, तुमसर यांचे न्यायालय

(पिठासीन अधिकारी एस. एस. जयस्वाल)

**नियमित फौज. प्रकरण क्र. ०१/२०१८** **निशाणी क.१३.**

**(CNR No. MHBH090000302018)**

सरकार तर्फे पोलिस स्टेशन अधिकारी,
**तुमसर**. ..... **अभियोगपक्ष**

—विरुध्द—

कैलास सुखराम ठाकरे
अंदाजे वय २६ वर्ष,
राह. निलज,
ता. मोहाडी, जि. भंडारा. ..... **आरोपी**

---

सरकारतर्फे श्रीराव मॅडम, विशेष सरकारी अभियोक्ता.
आरोपीतर्फे श्री. वासनिक, वकील.

---

## न्यायनिर्णय

(दिनांक १८/०२/२०२० ला पारीत)

आरोपीला भारतीय दंड विधान (यानंतर भा. दं. वि. असे संबोधण्यात येईल) चे कलम ३६३ अन्वये संपरिक्षित करण्यात आले आहे.

२. अभियोगपक्षाची हकीकत थोडक्यात अशी आहे की,

घटना दि. १२/०९/२०१७ रोजी सकाळी १०.०० वाजताच्या दरम्यान मौजा मिटेवानी येथे घडली. फिर्यादी अरविंद अनंतलाल रहांगडालेची मोठी मुलगी माधुरी शाळेत जाणेकरिता घरून निघुन गेली होती. त्यानंतर फिर्यादी शेतावर गेला व सायंकाळी ४.०० वाजतापर्यंत घरी परत आला. त्याची लहान मुलगी शाळेतुन ४.०० वाजता परत आली. परंतु, त्याची मोठी मुलगी घरी परत न आल्यामुळे जि. प. हायस्कुल मिटेवानी येथे जावुन तेथील शिक्षक पटले सर यांना माधुरीबाबत विचारले. पटले सरांनी तुमची मुलगी माधुरी आज शाळेत आली नसल्याचे फिर्यादीला

सांगितले. त्यानंतर फिर्यादीने गावामध्ये विचारपुस केली असता माधुरी आरोपीसोबत पटले याचे गाडीने कुठेतरी ग्राम पाथरीकडे गेल्याचे कळले. त्यावरून फिर्यादीने आनंदराव पटलेकडे विचारपुस केली असता त्यांनी तुमची मुलगी व आरोपी हे त्याचे नातेवाईकांकडे ग्राम पाथरी येथे असल्याचे फोनद्वारे सांगितले. त्यावरून फिर्यादी पाथरी येथे रात्री ७.३० वाजता दरम्यान गेला असता त्याची मुलगी व आरोपी तेथे मिळुन आले. फिर्यादीने त्याच्या मुलीला विचारले असता आरोपीने तिला शाळेतुन जबरदस्तीने गाडीवर बसवुन नेल्याचे सांगितले. त्यावरून फिर्यादीने पोलीस स्टेशन तुमसर येथे तोंडी फिर्याद दिली.

३. फिर्यादीने दिलेल्या तोंडी फिर्यादवरुन आरोपीविरुध्द पोलिस ठाणे, तुमसर येथे अपराध क्र. २९७/२०१७ प्रमाणे भा. दं. वि. चे कलम ३६३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. सदर प्रकरणाचा तपास पोलीस उपरिनिक्षक चंद्रकला मेसरे यांनी केला. त्यानंतर तपासी अधिकाऱ्यांनी घटनास्थळावर जावून दोन पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा तयार केला, फिर्यादीच्या मुलीचे वैद्यकीय अहवाल प्राप्त केले. प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे जाबजवाब नोंदविले. त्यांनतर पोलीस स्टेशन अधिकारी यांनी दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

४. आरोपीविरूध्द निशाणी क्र. ५ प्रमाणे भा.दं.वि. चे कलम ३६३ प्रमाणे दोषारोप निश्चित करण्यात आला. त्यातील आरोप हे आरोपीला वाचुन दाखविण्यात आले. आरोपीने ते मान्य व कबुल नसल्याचे सांगुन, त्याप्रमाणे आरोपीचे निवेदन निशाणी ६ वर नोंदिवण्यात आले. आरोपीने त्याचेविरुध्दचे आरोप फेटाळले व संपरिक्षेची विनंती केली. अभिलेखावर गुन्हादर्शक पुरावा उपलब्ध नसल्याने आरोपीचे बयाण फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३(१)(ब) अन्वये निवेदन नोंदविण्यात आले नाही.

५. सरकारी वकील श्रीराव मॅडम यांनी अभियोगपक्षातर्फे व बचावपक्षातर्फे श्री. वासनिक यांनी अभिलेखाप्रमाणे युक्तीवाद असल्याचे कळविले. दोषारोप व पुराव्याच्या अनुषंगाने खालील मुद्दे उपस्थित होतात. त्या मुद्दयांचा ऊहापोह पुराव्याच्या अनुषंगाने कारणांसहित कारणमिमांसेमध्ये करण्यात येईल. ते मुद्दे निष्कर्षासह खालीलप्रमाणे आहेत.

| प्रश्न | निष्कर्ष |
|---|---|
| १ अभियोगपक्ष असे सिध्द करतो काय की, दि. १२/०९/२०१७ रोजी, सकाळी १०.०० वाजताच्या सुमारास, मिटेवानी येथुन फिर्यादीची मुलगी माधुरी हिला आरोपीने फुस लावुन पळवुन नेले व भा.दं.वि चे कलम ३६३ अन्वये गुन्हा केला? | ...... नाही. |
| २ अंतिम आदेश काय? | ....... आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## <u>कारणमिमांसा</u>

६. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी एकुण दोन साक्षीदारांना तपासले आहे. फिर्यादी (अ.सा.क्र.१) (निशाणी ८) व माधुरी अरविंद रहांगडाले (अ.सा.क्र.२) (निशाणी ११) यांची साक्ष अभियोगपक्षाने नोंदविली आहे. अभियोगपक्षाने तोंडी फिर्याद (निशाणी ९) व छापील प्रथम खबर अहवाल (निशाणी १०) वर भिस्त ठेवली. अभियोगपक्षाने त्यांचा साक्षबंदबाबत निशाणी १ वर नमुद केले, त्यावरुन अभियोगपक्षाची साक्ष बंद करण्यात आली. बचावपक्षाने त्यांच्या बचावात तोंडी किंवा कागदोपत्री पुरावा दिलेला नाही.

**<u>विचारार्थ प्रश्न क्र. १</u>:**

७. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द भा.दं.वि. चे कलम ३६३ अन्वये गुन्हा सिध्द करण्यासाठी आरोपीने फिर्यादीची मुलगी माधुरी हिला फिर्यादीच्या कायदेशीर ताब्यातुन फुस लावुन पळवुन नेले, असे भारतीय पुरावा कायद्याचे कलम १०१ व १०२ अन्वये सिध्द करणे आवश्यक आहे.

८. फिर्यादी (अ.सा.क्र.१) ने कथन केले की, तो आरोपीला ओळखतो. आरोपी त्याचे गावचा रहिवासी आहे. घटना अंदाजे दोन वर्षापुर्वी घडली. तो माधुरीला दोन शब्द बोलला व त्यामुळे ती रागाने घरून शाळेकरिता निघुन गेली. तो त्याचे कामावर निघुन गेला. सायंकाळी तो घरी परत आल्यानंतर त्याला माधुरी दिसुन आली नाही. त्यावर त्याने नातेवाईकांकडे चौकशी केली. परंतु, माधुरीचा पत्ता

लागला नाही. एक–दोन दिवसानंतर त्याला माधुरी तिचे मामाकडे गेल्याचे कळले. तो माधुरीच्या मामाकडे जावुन माधुरीला घेवुन आला. दरम्यान संशयाच्या आधारावर त्याने आरोपीविरूध्द पोलीसात तक्रार दिली. तोंडी फिर्याद व छापील प्रथम खबर अहवालावर त्याची सही असुन मजकुर त्याला माहित नसल्याचे त्याने कथन केले. माधुरी (अ.सा.क्र.२) ने कथन केले की, फिर्यादी तिचे वडील आहेत. ती आरोपीला ओळखते. आईवडिल रागावल्याने ती रागाने घराबाहेर गेली होती. आरोपीने तिला घ राबाहेर पळवुन नेले नाही. पोलीसांनी तिचे बयाण नोंदविले होते.

९. अभियोगपक्षाने फिर्यादी व माधुरी (अ.सा.क्र.२) यांना उलटतपासात विचारावयाची उत्तरसुचक प्रश्ने विचारली. परंतु, अभियोगपक्ष त्यांच्या उलटतपासाद्वारे उपयुक्त साक्षपुरावा अभिलेखावर आणु शकलेला नाही. आरोपीने माधुरीला फुस लावुन पळवुन नेल्याबाबतच्या सुचनेला फिर्यादीने नाकारले. तसेच माधुरी (अ.सा.क्र.२) ने सुध्दा आरोपीने तिला पळवुन नेले होते याबाबतच्या सुचनेला नाकारले. फिर्यादी व माधुरी (अ.सा.क्र.२) यांनी अभियोगपक्षाच्या सर्व सुचनांना नाकारले. त्यांनी त्यांचे बयाणातील अधोरेखांकित भाग 'अ' मधील मजकुर बरोबर नसल्याचे कथन केले.

१०. फिर्यादी व माधुरी (अ.सा.क्र.२) यांच्या साक्षपुराव्यावरून आरोपीने माधुरीला फुस लावुन फिर्यादीच्या कायदेशीर ताब्यातुन पळवुन नेले, असे दिसुन येत नाही. माधुरी (अ.सा.क्र.२) हिने दिलेल्या कबुलीवरून आरोपीविरूध्द गुन्हा सिध्द होत नाही. फिर्यादीने तोंडी फिर्याद व छापील प्रथम खबर अहवालामधील मजकुर माहित नसल्याचे कथन केले. अभियोगपक्षाने दाखल अधिकारी व तपास अधिकारी यांची साक्ष नोंदविलेली नाही. त्यामुळे तोंडी फिर्याद व छापील प्रथम खबर अहवाल सिध्द झालेला नाही. माधुरी (अ.सा.क्र.२) ही प्रस्तुत प्रकरणामध्ये महत्वाची साक्षदार आहे. त्यामुळे तिचा साक्षपुरावा विश्वासार्ह वाटतो. परंतु, तिच्या व फिर्यादीच्या साक्षपुराव्यावरून आरोपीविरूध्द असलेल्या गुन्ह्याच्या अनुषंगाने गुन्हादर्शक साक्षपुरावा अभिलेखावर आलेला नाही. एकंदरित, वरिल साक्षपुराव्यावरून आरोपीने फिर्यादीची मुलगी माधुरी हिला फुस लावुन पळवुन नेले, असे सिध्द झालेले नाही. अभियोगपक्ष आरोपीविरूध्द भा. दं वि. चे कलम ३६३ अन्वये गुन्हा सिध्द करण्यास असफल

ठरलेला आहे. सबब विचारार्थ प्रश्न क्र. १ ला नकारार्थी उत्तर देत आहे.

**<u>विचारार्थ प्रश्न क्र. २</u>:**

११. विचारार्थ प्रश्न क्र. १ वरील नकारार्थी निष्कर्षामुळे आरोपी निर्दोष मुक्ततेस पात्र आहे. प्रकरणातील जप्त टी.व्ही.एस. स्टार सिटी कंपनीचे दुचाकी वाहन क्र. एम.एच. ३६/सी—६२५० जप्त केल्याचे दिसुन येते. सदर दुचाकी वाहनाबाबत बळीराम भिकराम मरस्कोल्हे रा. गारकाभोंगा (मोठागाव), ता. तुमसर, जि. भंडारा, यांचेशिवाय कोणीही हक्क सांगितला नाही. सदर दुचाकी वाहनाचा बळीराम भिकराम मरस्कोल्हे रा. गारकाभोंगा (मोठागाव), ता. तुमसर, जि. भंडारा, यांना सुपुर्दनाम्यावर अंतरिम ताबा दिला आहे. त्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४५२(१) अन्वये सदर दुचाकी वाहनाचा बळीराम भिकराम मरस्कोल्हे रा. गारकाभोंगा (मोठागाव), ता. तुमसर, जि. भंडारा, यांना दिलेला अंतरिम ताबा कायम करण्याबाबत आदेशीत करणे आवश्यक आहे. फौजदारी संहिताचे कलम ४३७—अ अन्वये या न्यायनिर्णयाविरुध्द करण्यात आलेल्या अपील किंवा इतर कार्यवाहीमध्ये वरिष्ठ न्यायालयात हजर राहण्याची हमी म्हणुन आरोपीने जामीन देणे आवश्यक आहे. सबब मुद्दा क्र. २ ला उत्तर म्हणून खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. आरोपीला भारतीय दंड विधानाचे कलम ३६३ या आरोपाकरीता फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात आले.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७—अ चे अनुपालनाकरीता जमानतदाराचे नवीन बंधपत्र रु. १५,०००/— पुढील सहा महिन्याकरीता अपील अवधीमध्ये वरिष्ठ न्यायालयापुढे हजर राहण्याकरीता द्यावे.

४. आव्हान कालावधीनंतर आव्हान दाखल न झाल्यास जप्त टी.व्ही.एस. स्टार सिटी कंपनीचे दुचाकी वाहन क्र. एम.एच. ३६/सी—६२५० चा बळीराम भिकराम मरस्कोल्हे रा. गारकाभोंगा (मोठागाव), ता. तुमसर, जि. भंडारा, यांना दिलेला अंतरिम ताबा कायम करण्यात यावा. आव्हान दाखल झाल्यास वरिष्ठ न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे जप्त टी.व्ही.एस. स्टार सिटी कंपनीचे दुचाकी

वाहन क्र. एम.एच. ३६/सी—६२५० चे विल्हेवाट करण्यात येईल.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

Digitally signed by Satish Shaliklal Jaiswal
Date: 2020.02.18 17:55:59 +0530

तुमसर.
दिनांक: १८/०२/२०२०.

(एस. एस. जयस्वाल)
प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,
तुमसर.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | P. B. Gajbhiye |
| Name of the Court | : | Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Tumsar. |
| Date of Judgment | : | 18/02/2020 |
| Judgment signed by the presiding officer on | : | 18/02/2020 |
| Judgment uploaded on | : | 18/02/2020 |